फौ.कि.अर्ज क्र.५१/२०२३ कोमल–वि–नितीन नि.क्र.२३ च्या पुढे

**<u>अर्जदारातर्फे सा.क्र.१ चा सरतपास शपथेवर सुरु</u>**

**<u>अर्जदारातर्फे ॲड. लोळगे यांच्या तर्फे</u>**

माझे नांवः कोमल नितीन गव्हाणे,

माझे अंदाजे वयः २६ वर्षे, व्यवसायः घरकाम,

रा. आलेगाव पागा, ता.शिरुर, जि.पुणे.

मला आता दि.१४/०८/२०२० रोजीची माझी व गैरअर्जदार क्र.१ यांचे विवाहाची लग्नपत्रीका दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **निशाणी क्र.३२** देण्यात येते. अ.क्र.२ एफ.आय.आय.क्र.३४५/२०२३, यवत पोलीस स्टेशन, सदरची फिर्याद ही मी गैरअर्जदार व मंगल गव्हाणे व सुखदेव गव्हाणे यांचेविरुध्द दि.११/०४/२०२३ रोजी भारतीय दंड विधान क्र.४९८–अ प्रमाणे नोंदविली होती. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.३३** देण्यात येते. अ.क्र.३ लगत मला गैरअर्जदार क्र.१ यांनी दिलेले दि.१५/०४/२०२३ रोजीचे नोटीस उत्तराची प्रत दाखविण्यात आली. सदरचे नोटीस उत्तर हे मी पाठविलेल्या दि.११/०३/२०२३ व २३/०३/२०२३ नोटीसींच्या अनुशंगाने मला देण्यात आले होते त्यास ओळखीच्या अनुशंगाने **निशाणी क्र.३४** देण्यात येते. मी शेतजमीनीचे सातबारा अभिलेखावर दाखल केले असुन त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.३५ ते ३९** देण्यात येते. मी माझी मुलगी नामे साईशा गव्हाणे हिचे दि.१०/०६/२०२४ रोजीचे तिचे पोटाचे विकाराचे अनुशंगाने झालेल्या वैद्यकीय चाचणीचा रिपोर्ट दाखल केलेला असुन ती त्याची मुळ प्रत

आहे. त्यास **निशाणी क्र.४०** देण्यात येते. सोनोग्राफीच्या फोटोप्रिंट यास निशाणी क्र.४१ देण्यात येते.

**गैरअर्जदार हजर वकील गैरहजर. गैरअर्जदारविरुध्द पुरावा स्ट्रक आऊट करण्यात आलेला आहे. अर्ज अभिलेखावर दाखल नाही करीता उलटतपास नाही.**

माझे समक्ष

CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR

Digitally signed by CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Date: 2026.08.20 17:45:16 +0530

दिनांक– २०/०८/२०२६
ठिकाण– घोडनदी

(**सी.एम. खारकर**)
न्या.दं.प्र.श्रेणी, कोर्ट क्र.३
घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे.